**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०७/२०२०** **दिनांक २४/०१/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १८/०१/२०२० ते २४/०१/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २५/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून २९/०१/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१८/०१** | **१९/०१** | **२०/०१** | **२१/०१** | **२२/०१** | **२३/०१** | **२४/०१** | | **२५/०१** | **२६/०१** | **२७/०१** | **२८/०१** | **२९/०१** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.१ | ३४.८ | ३५.५ | ३४.२ | ३६.८ | ३६.५ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३३ | ३२ | ३० | २९ | २९ |
| १५.५ | १८.० | १९.६ | १९.१ | २०.१ | २१.८ | - | **किमान तापमान (अं.से)** | २१ | २१ | २० | १८ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ० | ० | ० | १ | २ |
| ९६ | ८८ | ९५ | १०० | ९० | ९० | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५६ | ४६ | ४४ | ७२ | ८० |
| ५४ | ५७ | ६५ | ६८ | ६० | ६१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३० | २७ | २५ | २६ | ५२ |
| ४ | ३ | ३ | १ | २ | ३ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ६ | ७ | ४ | ६ | ८ |
| इ. | इ. | इ. | इ.पु. | इ. | इ.उ. | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | आ.पू. | नै.द. | प. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २५ ते २९ जानेवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात घट संभवते.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल** | **फुलोरा अवस्था** | • वाल पिकामध्ये शेंगा पोखरणारी अळी व घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीचा प्रादुर्भाव सुरुवातीला कोवळ्या कळ्यावर दिसून येतो व नंतर शेंगामध्ये शिरून कोवळ्या दाण्यांवर उपजीविका करते. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि. ली. किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही २० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. तसेच शेतामध्ये पक्षी थांबे उभारावे.<br>• वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति संवेदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **आंबा** | **बोंगे फुटणे ते मोहोर अवस्था** | • आंबा मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार दुसरी फवारणी बोंगे फुटताना, कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून करावी.<br>• तसेच मोहोर फुटलेल्या ठिकाणी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) इमिडाक्लोर्प्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे तुडतुडे, फुलकिडी तसेच मिजमाशीचे नियंत्रण होवू शकेल व त्याचा परपरागीकरण करणाऱ्या कीटकावर होणारा परिणाम टाळता येईल. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| **नारळ** | **-** | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे.<br>• नारळावर सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. या किडीच्या अळ्या माडाच्या खोडातील मऊ गाभा खाऊन खोड आतून पोखरून काढतात. अळ्या खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसतो. या किडीच्या नियंत्रणासाठी छिद्रातून शक्य असतील तेवढया अळ्या कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात. माडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये आणि झाल्यास त्याला बोर्डोपेस्ट लावावी. तसेच सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति हेक्टरी २ गंध सापळे लावावेत. |
| **चिकू** | **फळधारणा** | • चिकूच्या १ वर्षाच्या प्रती कलमास ५ किलो शेणखत, १५० ग्रॅम युरिया, ४५० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खतांचा पहिला हप्ता कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. पहिल्या वर्षी दिलेल्या खताच्या मात्रेच्या दुसऱ्या वर्षी दुप्पट, तिसऱ्या वर्षी तिप्पट या प्रमाणे वाढवून २० वर्षा पर्यंत २० पात खताचा हप्ता दयावा. २० वर्षानंतर प्रती कलमास १०० किलो शेणखत, ३ किलो युरिया, ९ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३ किलो म्युरेट ऑफ पोटश खतांचा दुसरा हप्ता देण्यात यावा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**